# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/म.व्य(भूमी)/D86653

दिनांक : 27/11/2019

## परिपत्रक

**विषय : महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार भूखंडावर ४० टक्के पेक्षा कमी बांधकाम करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला(BCC) प्राप्त केली आहे, अशा प्रकरणी भूखंडातील उर्वरित क्षेत्र विकसित करणेबाबत.....**

**संदर्भ :-परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/सी-०५५७९ दिनांक २१.०६.२०१९**

महामंडळाच्या अनेक औद्योगिक क्षेत्रात १० टक्क्यापेक्षा कमी क्षेत्राचा वापर करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला घेण्यात आलेला आहे. व उर्वरित क्षेत्र तसेच विनावापर पडून राहत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा वेळेस इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त असल्याने महामंडळास भूखंड परत घेण्याची कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे असे क्षेत्र कित्येक वर्ष मोकळे पडून राहते. तसेच औद्योगिक क्षेत्रात जागा उपलब्ध नसल्याने महामंडळाच्या बहुतांश औद्योगिक क्षेत्रात वाटपास भूखंड उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विनावापर पडून असलेले क्षेत्र भूखंडधारक विकसित करत नसल्यास, ते परत घेवून गरजू उद्योजकांना वाटप करता येईल तसेच भूखंडधारक भूखंडाचा पूर्णतः विकास करण्यास प्रवृत होतील, या उद्देशाने दिनांक २१.०६.२०१९ च्या परिपत्रकान्वये ४० टक्के चटई निर्देशकांचा वापर करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करण्यास स्पष्ट करण्यात आले होते. याबाबत अनेक निवेदने प्राप्त झाल्यामुळे सदर विषय पुनःश्च दिनांक २३.०८.२०१९ रोजी संचालक मंडळाच्या झालेल्या ३८३ बैठकीत सादर करण्यात येवून, सदर विषयावर संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, ठराव क्र. ५९८० पारित करण्यात आला.

सदरहू पारित ठरावानुसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात विकास नियंत्रण नियमावलीनुसार भूखंडावर ४० टक्के पेक्षा कमी बांधकाम करुन इमारत पूर्णत्याचा दाखला(BCC) प्राप्त केला आहे, अशा प्रकरणी भूखंडावरील उर्वरित क्षेत्र विकसित करणेबाबतचे दिनांक २१.०६.२०१९ च्या परिपत्रकात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. दिनांक २१.०६.२०१९ पूर्वी ज्या भूखंडधारकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला आहे व ते उत्पादनात आहेत, अशा भूखंडधारकांसाठी दिनांक २१.०६.२०१९ चे परिपत्रकास तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे.

२. उपरोक्त १ व्यतिरिक्त इतर भूखंडधारकांना सदरहू परिपत्रकातील धोरण लागू राहिल.

सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई